
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™


पान 3 वरुन...
पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न सुटण्याच्या दिशेने!

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 03 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जुलैमध्ये 2.11 लाख कोटी जीएसटी महसूल : सरकारी तिजोरीला बळ

# अर्थव्यवस्थेची दमदार भरारी!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**


**देशातील जीएसटी संकलनात जुलै 2026 मध्ये लक्षणीय वाढ होऊन ते 2.11 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. सरकारने शनिवारी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अहवालानुसार, जुलै 2026 मध्ये एकूण जीएसटी महसूल 2 लाख 11 हजार 205 कोटींवर पोहोचला. हे संकलन गेल्यावर्षीच्या याच कालावधीतील (जुलै 2025) 1 लाख 83 हजार 065 कोटींच्या तुलनेत 15.4 टक्क्यांनी वाढ दर्शवते. गेल्या 14 महिन्यांतील ही सर्वात जलद वाढ आहे. या आर्थिक वर्षात दुसऱ्यांदा मासिक संकलनाने 2 लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे.**




जुलै 2026 महिना भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक मोठी बातमी घेऊन आला आहे. देशाच्या वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. जीएसटी विभागाच्या माहितीनुसार, देशांतर्गत एकूण जीएसटी संकलन गेल्या वर्षीच्या 1.31 लाख कोटी रुपयांच्या तुलनेत 10.1 टक्क्यांनी वाढून 1.45 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. आयातीतून मिळणाऱ्या जीएसटी महसुलातही 28.8 टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदवली गेली. हे संकलन जुलै 2025 मधील 51,626 कोटींवरून जुलै 2026 मध्ये 66,511 कोटींपर्यंत वाढले. यावरून परकीय व्यापार आणि आयातीमधील वाढीचा थेट परिणाम कर संकलनावर झाल्याचे स्पष्ट होते. तज्ज्ञांच्या मते, जीएसटी महसुलातील ही वाढ मजबूत देशांतर्गत आर्थिक घडामोडी आणि वाढलेल्या आयातीमुळे झाली आहे.

परताव्यांची रक्कम समायोजित केल्यानंतर, निव्वळ जीएसटी महसूल 15.8 टक्क्यांनी वाढून 1.81 लाख कोटी झाला. देशांतर्गत निव्वळ महसूल 10.5 टक्क्यांनी वाढून 1.27 लाख कोटी झाला, तर सीमा शुल्काशी संबंधित निव्वळ जीएसटी संकलन 30.3 टक्क्यांनी वाढून 54,223 कोटी झाले. जुलै महिन्यातील एकूण जीएसटी परतावा 13.1 टक्क्यांनी वाढून 29,968 कोटी झाला.

एप्रिल ते जुलै 2026 या कालावधीत एकूण जीएसटी संकलन 10.1 टक्क्यांनी वाढून 8.43 लाख कोटी झाले, जे मागील वर्षी याच कालावधीत 7.66 लाख कोटी होते. निव्वळ जीएसटी महसूल 9.2 टक्क्यांनी वाढून 7.21 लाख कोटी झाला. यावरून चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत कर संकलन मजबूत राहिल्याचे दिसून येते.



### चालू आर्थिक वर्षातील महिनानिहाय संकलन

| | |
|---|---|
| एप्रिल 2026 | 2.42 लाख कोटी |
| मे 2026 | 1.94 लाख कोटी |
| जून 2026 | 1.94 लाख कोटी |
| जुलै 2026 | 2.11 लाख कोटी |

### राज्यनिहाय संकलन

| | |
|---|---|
| महाराष्ट्र : | 32,210 कोटी रु. |
| कर्नाटक : | 13,854 कोटी रु. |
| गुजरात : | 12,923 कोटी रु. |
| हरियाणा : | 11,892 कोटी रु. |
| उत्तर प्रदेश : | 9,651 कोटी रु |
| तेलंगणा : | 5,819 कोटी रु |

### महाराष्ट्र, कर्नाटकची अव्वल कामगिरी

प्रमुख राज्यांमध्ये, महाराष्ट्राने जुलै महिन्यात 32,210 कोटींचा जीएसटी महसूल नोंदवला. हे संकलन मागील वर्षाच्या तुलनेत 13 टक्क्यांनी अधिक आहे. तर कर्नाटकमधील संकलन 12 टक्के वाढीसह 13,854 कोटी रुपये इतके झाले. गुजरातचे संकलन 19 टक्क्यांनी वाढून 12,923 कोटी रुपये झाले. हरियाणाने 11,892 कोटी रुपये जमा केला असून ही 25 टक्क्यांची प्रभावी वाढ आहे. तेलंगणामध्ये 19 टक्के वाढीसह 5,819 कोटी रुपये आणि उत्तर प्रदेशमध्ये 15 टक्के वाढीसह 9,651 कोटी रुपये जीएसटी जमा झाला. या आकडेवारीत राज्यांनुसार काही घटही दिसून आली. मुख्यत्वे तामिळनाडूचा जीएसटी महसूल 1 टक्के, आंध्र प्रदेशचा 5 टक्के आणि मध्य प्रदेशचा 10 टक्क्यांनी घटला.



# नदी सुधार प्रकल्पाच्या कामाला विलंब नको!

## चंद्रकांत पाटील यांचे निर्देश; सीओईपीच्या वसतिगृह विस्ताराचाही घेतला आढावा

**महाईन्यूज । पुणे**

**सीओईपी टेक्नॉलॉजिकल विद्यापीठाला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येत वाढ होत आहे. ही बाब लक्षात घेऊन वसतिगृहाची क्षमता वाढविण्यासाठी सविस्तर आराखडा तयार करून सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. तसेच, नदी सुधार प्रकल्पाशी संबंधित महाविद्यालयाच्या परिसरातील कामे तातडीने सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.**



ना. पाटील यांनी आज सीओईपीमधील मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहांची तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बोट क्लब परिसराची पाहणी करून संबंधित कामांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी सीओईपीचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड, सीओईपी बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष विनायक पै, कुलसचिव डी. एन. सोनावणे, अभियांत्रिकी अधिष्ठाता डॉ. पराग सदगिर, विद्यार्थी संघटनेचे माजी सदस्य जगदीश कदम, डॉ. राजेंद्र हिरेमठ, भरत गिते, विवेक पवार; तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे उपअभियंता उमेश शिद्रुक आदी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान कुलगुरू डॉ. भिरुड यांनी मुलींच्या वसतिगृहाची विद्यमान क्षमता ९००, तर मुलांच्या वसतिगृहाची क्षमता १,२०० असल्याची माहिती दिली. स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने भविष्यातील गरज लक्षात घेऊन वसतिगृहाची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक आराखडा व अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश चंद्रकांत पाटील यांनी दिले.

यानंतर त्यांनी सीओईपीमधील बोट क्लब परिसराची पाहणी करून नदी सुधार प्रकल्पाचा आढावा घेतला. यावेळी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या नवव्या टप्प्यातील जमीन अधिग्रहणासंदर्भातील तांत्रिक अडचणींमुळे काम स्थगित असल्याची माहिती दिली. त्यावर महापालिका आयुक्तांशी चर्चा करून संबंधित अडचणी दूर करण्यात येतील, असे सांगत प्रकल्पाचे काम कोणताही विलंब न लावता तातडीने सुरू करण्याचे निर्देश चंद्रकांत पाटील यांनी दिले.

### नदी सुधार प्रकल्पाला गती द्या!

सीओईपी परिसरातील नदी सुधार प्रकल्पाच्या नवव्या टप्प्यातील कामाला तांत्रिक अडचणींमुळे विलंब होत आहे. या अडचणी महापालिका आयुक्तांशी चर्चा करून दूर करून काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

### वसतिगृहांचा विस्तार होणार

स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर सीओईपीतील विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. मुलींच्या वसतिगृहाची क्षमता ९००, तर मुलांच्या वसतिगृहाची क्षमता १२०० आहे. भविष्यातील गरज लक्षात घेऊन क्षमता वाढीचा आराखडा सादर करण्याचे निर्देश चंद्रकांत पाटील यांनी दिले.

# पीएमपीएलचा 'मोबिलिटी प्लॅन' फेल; बससेवेचा बोजवारा!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी तयार करण्यात आलेला पुणे महानगर परिवहन महामंडळाचा (पीएमपीएल) 'सर्वसमावेशक गतिशीलता योजना' (सीएमपी) प्रत्यक्ष अंमलबजावणीत अपुरा पडत असल्याचे अधिकृत आकडेवारीवरून समोर आले आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आराखडा तयार करण्यात आला असला तरी बसफेऱ्या, आगार, ताफा उपलब्धता, मनुष्यबळ आणि आर्थिक शिस्त या मूलभूत बाबींमध्ये अपेक्षित सुधारणा झालेली नाही.**




प्रवाशांची संख्या वाढत असताना पीएमपीच्या ताफ्यातील अनेक बस प्रत्यक्ष रस्त्यावर उतरविण्यात अडचणी येत आहेत. मोबिलिटी प्लॅनमध्ये बस ताफा वाढविणे, नवीन आगार व फलाट उभारणे, नियमित बसफेऱ्या, ई-बस आणि एकात्मिक वाहतूक व्यवस्था अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. मात्र, प्रत्यक्षात नियोजित बसफेऱ्या मोठ्या प्रमाणात रद्द होत असून अनेक बस विविध कारणांमुळे सेवेतून बाहेर आहेत.

अधिकृत आकडेवारीनुसार, २०२१-२२ मध्ये ५.४३ कोटी किलोमीटर, २०२४-२५ मध्ये १.७४ कोटी किलोमीटर आणि २०२५-२६ मध्ये १.५७ कोटी किलोमीटर इतक्या नियोजित बसफेऱ्या रद्द झाल्या. त्यामुळे दररोज हजारो प्रवाशांना बससेवेच्या अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर आगार ते मार्ग विनाप्रवासी धावणाऱ्या बसच्या 'डेड किलोमीटर'मध्येही वाढ झाली आहे. २०२४-२५ मध्ये तब्बल १.३१ कोटी किलोमीटर बस विनाप्रवासी धावल्या.

ताफ्यातील बस उपलब्ध नसल्यानेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत आहे. २०२१-२२ मध्ये ६५८, २०२३-२४ मध्ये ४०७ आणि २०२४-२५ मध्ये ३७५ बस ऑफ-रोड होत्या. परिणामी, फ्लीट युटिलायझेशन केवळ ८५.४० टक्क्यांवर आले आहे. विशेषतः उपनगरांमध्ये बससाठी प्रवाशांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे.

नवीन बस आणण्याबरोबरच त्या चालविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे हे पीएमपीसमोरील मोठे आव्हान आहे. राष्ट्रीय निकषानुसार एका बसमागे ६.३८ कर्मचारी आवश्यक असताना पीएमपीमध्ये हे प्रमाण केवळ ४.५३ आहे. म्हणजेच प्रत्येक बसमागे सुमारे १.८५ कर्मचारी कमी आहेत. चालक, वाहक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता दूर केल्याशिवाय ताफा वाढवूनही अपेक्षित सेवा देणे कठीण ठरणार आहे.

मोबिलिटी प्लॅननुसार पुणे महापालिका हद्दीत पीएमपीसाठी ३२ जागा डेपो व टर्मिनलसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. हडपसर, संगमवाडी, दांडेकर पूल, पाषाण, कोथरूड, बिबवेवाडी, मुंढवा आणि येरवडा यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांचा त्यात समावेश आहे. मात्र, या जागांचे हस्तांतरण आणि विकास रखडल्याने नवीन बसचे पार्किंग, ई-बस चार्जिंग आणि देखभालीच्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत.

पीएमपीच्या आर्थिक स्थितीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेच्या २०२३-२४ च्या अहवालानुसार, पीएमपीचा प्रतिकिलोमीटर खर्च ११४ रुपये, तर उत्पन्न केवळ ५७.२२ रुपये आहे. म्हणजे प्रत्येक किलोमीटरमागे ५६.७८ रुपयांचा तोटा होत आहे. या आर्थिक तफावतीमुळे महामंडळाचा वार्षिक तोटा ७०६.३५ कोटी रुपये झाला आहे. तुलनेत बंगळुरूच्या बीएमटीसीचा प्रतिकिलोमीटर खर्च ७९.८८ रुपये आहे.

शहराची वाढती लोकसंख्या आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता पीएमपीसमोर केवळ नवीन बस ताफ्यात दाखल करण्याचे आव्हान नाही, तर उपलब्ध बस पूर्ण क्षमतेने रस्त्यावर उतरविणे, पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करणे, आगारांसाठी आरक्षित जागांचा विकास करणे आणि आर्थिक तोटा कमी करणे ही आव्हानेही आहेत. त्यामुळे सीएमपीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या मूलभूत प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

### मोबिलिटी प्लॅन कागदावरच?

पीएमपीएलच्या नियोजित बसफेऱ्या मोठ्या प्रमाणात रद्द होत असून, शेकडो बस ऑफ-रोड आहेत. मनुष्यबळाची कमतरता, आगारांसाठी जागांचा रखडलेला प्रश्न आणि वाढता आर्थिक तोटा यामुळे सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्याच्या आराखड्याच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडचा पाणीप्रश्न सुटण्याच्या दिशेने!

## भामा आसखेड जलवाहिनीचे ८० टक्के काम पूर्ण; उर्वरित कामाला वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**साडेपाच वर्षांपासून रखडलेल्या भामा आसखेड जलवाहिनीच्या कामाला ठेकेदार बदलल्यानंतर वेग आला आहे. जलवाहिनीचे सुमारे ८० टक्के, तर जॅकवेलचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता ही योजना महत्त्वाची असून, उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेने आंद्रा धरणातून १०० एमएलडी आणि भामा आसखेड धरणातून १६८ एमएलडी, असे एकूण २६८ एमएलडी अतिरिक्त पाणी शहरासाठी आणण्याचे नियोजन केले आहे. भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी खेड, वाकी तर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून तळेगाव दाभाडे एमआयडीसीतील नवलाख उंबरे येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत ७.३० किलोमीटर आणि तेथून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १८.३० किलोमीटर जलवाहिनी टाकण्यात येत आहे.

या प्रकल्पाचे काम १५ डिसेंबर २०२० रोजी एका ठेकेदाराला देण्यात आले होते. १४ डिसेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित असतानाही प्रशासनाने दिलेल्या तीन मुदतींमध्ये काम केवळ ७० टक्क्यांपर्यंतच झाले. त्यामुळे सुमारे तीन महिन्यांपूर्वी ठेकेदार बदलण्यात आला. नवीन ठेकेदाराकडे काम सोपवल्यानंतर प्रकल्पाच्या कामाला वेग आला आहे.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी भामा आसखेड धरण ते नवलाख उंबरे येथील बीपीटीपर्यंतच्या १७०० मिलिमीटर व्यासाच्या नलिकेचे काम, नवलाख उंबरे ते देहूपर्यंतच्या १४०० मिलिमीटर व्यासाच्या गुरुत्व नलिकेचे काम तसेच धरण परिसरातील जॅकवेलची पाहणी केली. धरणाच्या पाण्याखाली सुमारे १०० फूट खोल असलेल्या बोगद्याचीही त्यांनी पाहणी केली.

### गुणवत्तेशी तडजोड न करण्याच्या सूचना

भामा आसखेड पाणीपुरवठा योजना शहराच्या भविष्यातील गरजांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रकल्पातील कामे गुणवत्तापूर्ण आणि सुरक्षित पद्धतीने पूर्ण करण्याबरोबरच कोणतीही तडजोड न करता उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना, सल्लागारांना आणि ठेकेदाराला देण्यात आल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

### १५ टक्के पाणीकपात कायम

पवना धरणातील पाणीसाठा वाढला असला तरी धरण अद्याप पूर्ण क्षमतेने भरलेले नाही. त्यामुळे शहरातील १५ टक्के पाणीकपात सध्या कायम ठेवण्यात आली आहे. ऑक्टोबरपर्यंत धरणात शंभर टक्के पाणीसाठा झाल्यासच ही कपात रद्द करण्याचा विचार केला जाणार आहे. अन्यथा पाणीकपात पुढेही कायम राहण्याची शक्यता आहे.

### साडेसहा वर्षांपासून दिवसाआड पाणी

समन्यायी पाणीवाटपाचे कारण देत महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. साडेसहा वर्षांनंतरही ही व्यवस्था कायम असून, अनेक भागांत अनियमित, अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. भामा आसखेडचे पाणी शहरात दाखल होईपर्यंत दिवसाआड पाणीपुरवठा सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

---

## ‘डीपी’वरील ५६ हजार हरकतींवर आजपासून सुनावणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास आराखड्यावर (डीपी) प्राप्त झालेल्या ५६ हजार ७७१ हरकतींवर आज, सोमवार (३ ऑगस्ट)पासून प्रत्यक्ष सुनावणीला सुरुवात होत आहे. आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ही सुनावणी होणार असून, सुनावणीच्या कालावधीत नाट्यगृह कोणत्याही कार्यक्रमासाठी भाड्याने दिले जाणार नाही.**

महापालिकेने सुधारित प्रारूप विकास आराखडा १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध केला होता. त्यावर १४ जुलै २०२५ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या कालावधीत तब्बल ५६ हजारांहून अधिक हरकती प्राप्त झाल्या. या हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास महापालिका सर्वसाधारण सभेने १५ मे २०२६ रोजी मंजुरी दिली.


हरकत नोंदविलेल्या नागरिकांना टपालाद्वारे सुनावणीची तारीख, वेळ आणि ठिकाण कळविण्यात आले आहे. सुनावणीसाठी आवश्यक साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले असून, नगररचना विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

### १७३.२४ चौरस किलोमीटरचा आराखडा

महापालिका आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्रासह एकूण १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्राचा या विकास आराखड्यात समावेश आहे. शहराच्या भविष्यातील विकासाचा विचार करून २०३१ पर्यंत ४२ लाख ४० हजार, तर २०४१ पर्यंत ६१ लाख लोकसंख्या गृहीत धरून आराखडा तयार करण्यात आल्याचे नगररचना विभागाने स्पष्ट केले आहे.

### १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य

विकास आराखड्यावरील कार्यवाही पूर्ण करण्याची मूळ बारा महिन्यांची मुदत १४ मे २०२६ रोजी संपणार होती. मात्र, निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रक्रिया सुमारे एक महिना रखडली. त्यामुळे सहा महिन्यांची मुदतवाढ घेण्यात आली आहे. आता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सुनावणी पूर्ण करून आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्याचे नियोजन आहे. “विकास आराखड्यावर आलेल्या हरकतींवर आजपासून सुनावणी सुरू होत आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात येईल. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर आराखडा शासनाकडे पाठविण्यात येईल,” अशी माहिती महापालिका नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे यांनी दिली.



### सात सदस्यीय समितीकडून सुनावणी

हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीत नगररचना विभागाचे निवृत्त सहसंचालक प्रकाश भुक्ते, निवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, निवृत्त उपसंचालक उत्तरेश्वर लोंढे आणि पर्यावरण अभियंता नरसू शिंदे या चार तज्ज्ञांचा समावेश आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, सदस्य संदीप कस्पटे आणि सारिका गायकवाड हे तीन लोकप्रतिनिधी समितीत आहेत.



## भूमिका

**हवामानातील बदल हा आता केवळ वैज्ञानिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर तो प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारे वास्तव बनला आहे. ऋतूंचे चक्र विस्कळीत होत आहे. अवकाळी पाऊस, उष्णतेच्या तीव्र लाटा, अचानक पूर, भीषण दुष्काळ आणि वणवे यांसारख्या घटनांची वारंवारता वाढत आहे.**

# हवा बदलते आहे; जग सावध आहे का?



युरोपपासून भारतापर्यंत निसर्गाचे बदलते रूप मानवाला नव्या संकटांची जाणीव करून देत आहे.

यंदा युरोपातील फ्रान्स, स्पेन, ग्रीस, तुर्कीये आणि ब्रिटनमध्ये भीषण वणव्यांनी मोठे नुकसान केले. फ्रान्समधील बोर्दो परिसरातील हजारो हेक्टर जंगल आणि शेती जळून खाक झाली, तर लाखो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवावे लागले.

अत्याधुनिक तंत्रज्ञान, विशेष अग्निशमन विमाने आणि प्रशिक्षित यंत्रणा असूनही या आगींवर नियंत्रण मिळविण्यास मोठा संघर्ष करावा लागला. काही ठिकाणी वणव्यांमुळे तयार झालेल्या धूर आणि उष्णतेच्या ढगांनी परिस्थिती अधिक गंभीर केली. हवामानातील अस्थिरतेसमोर आधुनिक व्यवस्थाही किती मर्यादित ठरू शकते, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

दुसरीकडे भारतात 'एल निनो'मुळे पावसाचा तुटवडा भासेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात अनेक राज्यांमध्ये विक्रमी पाऊस आणि पूरस्थिती निर्माण झाली. गुजरातमधील उंबरगाव येथे अवघ्या २४ तासांत हजार मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस पडून शतकभरातील विक्रम मोडला.

काही भागांत मुसळधार पाऊस, तर काही ठिकाणी पावसाची कमतरता असे चित्र दिसले. यामुळे केवळ एकूण पावसाचे प्रमाण नव्हे, तर तो नेमका कुठे आणि किती पडेल, याचा अचूक अंदाज बांधणे अधिक कठीण होत असल्याचे स्पष्ट झाले.

हवामान खात्याचे इशारेही अनेकदा अपेक्षेप्रमाणे ठरत नाहीत. पिवळा, नारिंगी किंवा लाल इशारा देऊनही पाऊस पडत नाही, तर कोणतीही पूर्वसूचना नसताना पूरस्थिती निर्माण होते. यावरून हवामानातील बदलांची गुंतागुंत वाढत असल्याचे दिसून येते. जागतिक तापमानवाढ, समुद्राच्या पृष्ठभागाचे वाढते तापमान आणि वातावरणातील बदलती चक्रे यामुळे हवामानाचा पारंपरिक अभ्यास अपुरा पडत आहे.

या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करणे, हवामान अंदाज प्रणाली अत्याधुनिक बनवणे आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. वृक्षसंवर्धन, कार्बन उत्सर्जनात घट आणि शाश्वत विकासाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी याशिवाय पर्याय नाही.

हवामान बदल ही भविष्यातील नव्हे, तर वर्तमानातील समस्या आहे. निसर्गाचे बदलते संकेत ओळखून वेळेत उपाययोजना केल्या तरच भविष्यातील संकटांची तीव्रता कमी करता येईल. कारण एक गोष्ट आता निर्विवाद झाली आहे—हवा बदलते आहे आणि त्या बदलाशी जुळवून घेणे हीच मानवजातीपुढील सर्वात मोठी परीक्षा आहे.

## प्रासंगिक »

### परिश्रमांची किंमत

**एक प्रजादक्ष राजा वेशांतर करून प्रजेची परिस्थिती जाणून घेत असे. एकदा सीमेलगतच्या गावात फिरताना त्याला एक वृद्ध लाकूडतोड्या कष्टाने लाकडे तोडताना दिसला.**

त्याच्या शेजारीच हिऱ्यांनी भरलेली एक शिळा होती. राजाने आश्चर्याने विचारले, "या शिळेतील एक हिरा विकलास तरी आयुष्यभर सुखात राहशील. मग एवढे कष्ट का करतोस?"

लाकूडतोड्या शांतपणे म्हणाला, "महाराज, हे हिरे मला लहानपणापासून माहीत आहेत. पण देवाने मला हात-पाय परिश्रम करण्यासाठी दिले आहेत, ऐषआरामासाठी नाहीत. जोपर्यंत माझ्यात काम करण्याची ताकद आहे, तोपर्यंत मला हिऱ्यांची गरज नाही. स्वतःच्या कष्टाने मिळालेला घासच सर्वात गोड असतो."

लाकूडतोड्याचे उत्तर ऐकून राजाला परिश्रमाचे खरे महत्त्व उमगले. त्याला जाणवले की खरी श्रीमंती हिऱ्यांत नसून प्रामाणिक श्रम, स्वाभिमान आणि समाधानात असते.

- तात्पर्य : कष्टाने मिळवलेले यश आणि स्वाभिमानाने जगलेले जीवन हे कोणत्याही संपत्तीपेक्षा अधिक मौल्यवान असते.

राज्यातील शाळांच्या कॅन्टीनमध्ये आणि शाळेपासून ५० मीटर परिसरात जंकफूडच्या विक्री व जाहिरातींवर बंदी लागू करण्याचा अन्न व औषध प्रशासनाचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे.

# जंकफूडला आळा; आरोग्यदायी सवयींचा पाया






मुलांमध्ये वाढणारा लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि इतर जीवनशैलीजन्य आजार लक्षात घेता हा निर्णय केवळ प्रशासनाचा आदेश नसून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक पाऊल आहे. मात्र, या निर्णयाचे यश केवळ घोषणेत नसून प्रभावी अंमलबजावणीत दडलेले आहे.

शाळांमधील जंकफूडबाबतचे नियम नवीन नाहीत. 'फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अँथॉरिटी ऑफ इंडिया'ने २०२० पासून यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. तसेच तंबाखू व मद्यविक्रीसंदर्भातील अनेक कायदेशीर निर्बंधही वर्षानुवर्षे अस्तित्वात आहेत. तरीही शाळांच्या परिसरात वेफर्स, शीतपेये, चॉकलेट्स, समोसे, वडापाव यांसारखे पदार्थ सहज उपलब्ध होतात. त्यामुळे कायदे असले तरी त्यांची काटेकोर अंमलबजावणी झालेली नाही, हे वास्तव आहे.

आज मुलांच्या आहारात घरगुती पदार्थांपेक्षा प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण वाढले आहे. अनेक पालक वेळेअभावी किंवा मुलांच्या हट्टापोटी डब्यात जंकफूड देतात किंवा ते विकत घेण्यासाठी पैसे देतात. परिणामी शाळेबाहेरील विक्रीवर बंदी घातली तरी घरातूनच जंकफूड डब्यात येत राहिले, तर अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही. त्यामुळे या समस्येकडे केवळ कायद्याच्या चौकटीतून नव्हे, तर सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

या निर्णयाच्या यशासाठी शाळा, पालक, स्थानिक स्वराज्य संस्था, अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि आरोग्य विभाग यांचे समन्वित प्रयत्न आवश्यक आहेत. शाळांनी पालकांशी नियमित संवाद साधून संतुलित आहाराचे महत्त्व पटवून द्यावे. कॅन्टीनमध्ये पौष्टिक पर्याय उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये पोषणविषयक जनजागृती करणे आणि नियमांचे सातत्याने पालन करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

तुकाराम मुंढे यांनी या विषयाला चालना दिली असली, तरी ही मोहीम कोणत्याही एका अधिकाऱ्यावर अवलंबून राहता कामा नये. अधिकारी बदलतील, सरकार बदलेल; पण मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कायम राहणार आहे. जंकफूडविरोधी लढा हा बंदीपुरता मर्यादित न राहता आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्याचा व्यापक उपक्रम बनला, तरच या निर्णयाचे खरे यश ठरेल. कारण निरोगी विद्यार्थी हेच निरोगी समाजाचे आणि सक्षम राष्ट्राचे भक्कम आधारस्तंभ असतात.

## ।। अभंगवाणी ।।



माझिया मीपणा ।
जाला यावरी उगाणा ॥१॥

भोगी त्यागी पांडुरंग ।
त्यानें वसविलें अंग ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कर्जमाफीच्या वाटेत 'फार्मर आयडी'चा अडथळा

## रत्नागिरीत ७,००८ शेतकरी पात्र, मात्र ६९ टक्के लाभार्थी अजूनही वंचित

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो पात्र शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. कर्जमाफीसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना 'अॅग्रीस्टॅक फार्मर आयडी' आणि ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आल्याने तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. जिल्ह्यातील तब्बल ४,८९९ पात्र शेतकरी अद्याप फार्मर आयडीच्या प्रतीक्षेत असून, सुमारे ६९ टक्के पात्र लाभार्थी प्रत्यक्ष कर्जमाफीपासून वंचित आहेत.**




जिल्ह्यात एकूण ७,००८ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले आहेत. त्यापैकी केवळ २,१०९ शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार केला आहे. उर्वरित ४,८९९ शेतकऱ्यांकडे अद्याप हा आयडी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे शासनाने कर्जमाफीसाठी पात्र ठरवूनही अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही.

ई-केवायसीची स्थितीही समाधानकारक नाही. जिल्ह्यातील ३,००२ शेतकऱ्यांनी ई-केवायसी पूर्ण केली असून, ४,००६ शेतकऱ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे कर्जमाफीची प्रक्रिया फार्मर आयडी आणि ई-केवायसीच्या तांत्रिक अटींमध्ये अडकली आहे.

फार्मर आयडी तयार करताना अनेक शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्वतंत्र सातबारा नसणे, जमीन कुटुंबातील अन्य सदस्यांच्या नावावर असणे किंवा मालकी हक्काच्या नोंदी अपूर्ण असणे यामुळे आयडी तयार करण्याची प्रक्रिया रखडत आहे. परिणामी, पात्रता असूनही कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास विलंब होत आहे.

कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतरही तांत्रिक प्रक्रियेच्या अडथळ्यामुळे हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे 'कर्जमाफी जाहीर झाली, आता पैसे खात्यात कधी?' असा प्रश्न शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. प्रलंबित फार्मर आयडी आणि ई-केवायसीची प्रक्रिया तातडीने पूर्ण झाल्यानंतरच सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

"कर्जमाफीच्या तांत्रिक बाबी दूर करून शेतकऱ्यांनी आपली कर्जमाफी करून घेणे आवश्यक आहे. शासनाच्या अटींनुसारच ही कर्जमाफी दिली जात आहे," असे रत्नागिरीचे जिल्हा कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी सांगितले.

### मोफत ई-केवायसीची सुविधा

प्रलंबित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पात्र शेतकऱ्यांना तातडीने ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन केले आहे. लाभार्थ्यांनी यादीतील विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड, कर्ज खात्याचे पासबुक आणि बँक खात्याचे पासबुक सोबत घेऊन जवळच्या 'आपले सरकार' सेवा केंद्र किंवा सीएससी केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. ही सेवा मोफत उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### कर्जमाफीचा लाभ तांत्रिक अडथळ्यात

रत्नागिरी जिल्ह्यात ७,००८ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले असले तरी ४,८९९ शेतकऱ्यांचा फार्मर आयडी अद्याप तयार झालेला नाही. तसेच ४,००६ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित असल्याने पात्र असूनही हजारो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित आहेत.

# राज्यात पावसाचा कहर; चंद्रपूर, जळगावला अतिवृष्टीचा तडाखा



**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शनिवारी काहीशी विश्रांती घेतली असली, तरी चंद्रपूर आणि जळगाव जिल्ह्यांत अतिवृष्टीने परिस्थिती गंभीर झाली आहे. अनेक धरणे भरून वाहत असून त्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना पुराचा धोका निर्माण झाला असून, अनेक मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.**

चंद्रपूर जिल्ह्यात इरई नदीच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने प्रशासनाने खबरदारी म्हणून सुमारे ३० नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर केले. आरवट येथील सहारा पार्क परिसरातील ४० कुटुंबांच्या घरांत पाणी शिरल्याने त्यांनाही सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. वर्धा नदीची पातळी वाढल्याने राजुरा-बामणी (बल्लारपूर) मार्ग बंद करण्यात आला असून, राजुरा-सास्तीमार्गे बल्लारपूरकडे वाहतूक सुरू आहे. कढोली-कोलगाव, सास्ती-कोलगाव, चारवट-माना, भोयगाव-भारोसा आणि पोडसा-शिरपूर मार्गही पुराच्या पाण्यामुळे बंद आहेत.

चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळाच्या सकाळी आठ वाजताच्या अहवालानुसार, बल्लारपूर (बामणी) येथे वर्धा नदीची पाणीपातळी १७२.६१ मीटर असून, ११,४२२ क्युमेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे. घुग्घुस येथील वर्धा नदीही धोक्याच्या पातळीवरून वाहत आहे. जळगाव जिल्ह्यातही सलग दुसऱ्या दिवशी अतिवृष्टी झाली. गुरुवारी १४ तालुक्यांतील ७५ मंडळांना पावसाचा तडाखा बसल्यानंतर शुक्रवारी पुन्हा ९ तालुक्यांतील २४ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली.

दरम्यान, परतूर तालुक्यात दोन दिवस झालेल्या जोरदार पावसामुळे निम्न दुधना प्रकल्पातील पाणीसाठ्यात २.८५ टक्क्यांनी वाढ झाली असून, जिवंत पाणीसाठा २३.५१ टक्क्यांवर पोहोचला आहे.

### राज्यात पूरस्थिती गंभीर

चंद्रपूर, जळगावमध्ये अतिवृष्टीचा तडाखा बसला असून अनेक मार्ग पुराच्या पाण्यामुळे बंद करण्यात आले आहेत. कोयना, उजनी आणि वीर धरणांतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असल्याने नीरा-भीमा नद्यांना पूर आला आहे. P[तुर्त प्रशासनाकडून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सातारा जिल्ह्यातील कोयना धरणात २४ तासांत ५ टीएमसीने वाढ होऊन पाणीसाठा ९० टीएमसी झाला आहे. धरणाचे दरवाजे सहा फूट उघडून विसर्ग सुरू आहे. उजनी धरण ओव्हरफ्लो झाले असून त्यातून ८० हजार क्युसेक विसर्ग सुरू आहे. वीर धरणातून नीरा नदीत २० हजार क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नीरा आणि भीमा नद्या दुथडी भरून वाहत असून पंढरपूरसह नदीकाठच्या गावांना पुराचा धोका निर्माण झाला आहे.

धुळे जिल्ह्यात कनेर नदीला आलेल्या पुरात अंबोडे येथील आनंद भागवत पारखे (६०) आणि त्यांचा मुलगा दिनेश (२५) वाहून गेले आहेत. त्यांचा शोध सुरू आहे. शुक्रवारी जिल्ह्यात सरासरी १३३.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. हवामान विभागाच्या इशाऱ्यामुळे जिल्ह्यातील शाळा आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

अमळनेरमध्येही मुसळधार पावसानंतर पाण्यात वाहून जाणाऱ्या महावीर प्रवीण जैन या तरुणाला काही युवकांनी वाचवले. बेशुद्ध अवस्थेत बाहेर काढल्यानंतर त्याचा श्वास थांबला असल्याचे लक्षात येताच युवकांनी त्याला सीपीआर दिला. काही वेळाने त्याने प्रतिसाद देत श्वास घेण्यास सुरुवात केली.

# इराणवरील हल्ल्याला ट्रम्प यांचा ‘ब्रेक’!

## मध्यपूर्वेतील देशांच्या विनंतीनंतर निर्णय; शांतता करारासाठी वेगाने हालचाली

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील नियोजित लष्करी हल्ला तूर्तास रद्द केला आहे. इराण आणि इतर मध्यपूर्वेतील देशांनी केलेल्या विशेष विनंतीनंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली. ट्रूथ या सोशल मीडियावरून त्यांनी यासंदर्भातील माहिती दिली.**



अमेरिकेने इराणविरुद्ध दुसऱ्या महायुद्धानंतरची सर्वात मोठी लष्करी तयारी केली होती. मात्र, इराणसोबत एका कराराची प्राथमिक रूपरेषा ठरल्यामुळे हा हल्ला रोखण्यात आला आहे. या नव्या करारामध्ये होर्मुझची सामुद्रधुनी आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी त्वरित आणि पूर्णपणे खुली करणे, तसंच इराणचा आण्विक धोका संपवणे या प्रमुख अटींचा समावेश आहे.

अमेरिका इराणविरुद्ध अत्यंत तीव्र आणि शक्तिशाली कारवाईसाठी सज्ज होती. इराण आणि मध्यराष्ट्रीय देशांच्या विनंतीवरून जागतिक शांततेसाठी आणि इराणच्या अस्तित्वासाठी हल्ला रद्द करण्यात आला. या शांतता प्रक्रियेत आणि कराराच्या बांधिलकीत इस्रायल देशही अमेरिकेसोबत आहे. हा करार जलद गतीने पूर्ण करण्याचे आदेश ट्रम्प यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

“जगाच्या भविष्यातील फायद्यासाठी आणि त्याचप्रमाणे एका यशस्वी व समृद्ध इराणच्या अस्तित्वासाठी, मी हा हल्ला रद्द करण्यास सहमती दर्शविली आहे; मात्र,लम हाचत हे वेगाने करार करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल. इस्रायल देशही माझ्या या वचनबद्धतेत सामील आहे. प्रत्येकाने कामाला लागा आणि हे पूर्ण करा,” असे त्यांनी पुढे जोडले.

### इराणची प्रतिक्रिया काय?

इस्त्रायलने या मुद्द्यावर त्वरित कोणतीही जाहीर प्रतिक्रिया दिली नाही. अमेरिकेने इराणच्या ठिकाणांवर नवीन हल्ले करण्याच्या ट्रम्प यांच्या धमक्यांची अंमलबजावणी केल्यास, त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशारा तेहरानने दिला होता. कुवेतच्या लष्कराने इराणकडून अनेक महत्त्वाच्या ठिकाणांवर डागलेले शत्रूचे ड्रोन नष्ट केल्याचं सांगितल्यानंतर अवघ्या काही तासांतच, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी शनिवारी तुर्की, पाकिस्तान आणि सौदीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवर वेगवेगळ्या चर्चा केल्या.

---

# कुलगाममध्ये दोन मजुरांची हत्या; हल्ल्यापूर्वी २० मिनिटे गप्पा



**महाईन्यूज । श्रीनगर**

**जम्मू-कश्मीरमधील कुलगाम येथे दोन मजुरांच्या हत्येच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. शुक्रवारी रात्री लष्कर-ए-तोएबाचा दहशतवादी लतीफ बट याने वीटभट्टीवर काम करणाऱ्या दोन मजुरांची गोळ्या झाडून हत्या केल्याचे तपासात समोर आले आहे. हल्ल्यापूर्वी त्याने मजुरांशी सुमारे २० मिनिटे संवाद साधून त्यांचा विश्वास संपादन केला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.**

छत्तीसगडमधील शक्ती जिल्ह्यातील बुंदेली गावचा दीपक रात्रे (२४) आणि सारंगढ-बिलाईगड जिल्ह्यातील भूपेंद्र भइना (२८) अशी मृतांची नावे आहेत. रोजगाराच्या शोधात हे दोघे कश्मीरमध्ये गेले होते आणि कुलगाम येथील वीटभट्टीवर काम करत होते.

तपासानुसार, लतीफ बट काळी बॅग घेऊन घटनास्थळी आला होता. या बॅगेत त्याने रायफल लपवली होती. त्याने प्रथम मजुरांची नावे विचारली आणि त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर तहान लागल्याचे सांगून पाण्याचा ग्लास मागितला. मजुरांपैकी एका व्यक्तीची पत्नी पाणी आणण्यासाठी गेल्यानंतर त्याने अचानक गोळीबार सुरू केला. या हल्ल्यात दोन्ही मजुरांचा मृत्यू झाला. घटनास्थळाजवळ दीड ते दोन वर्षांचे एक लहान मूलही उपस्थित होते. गोळीबारानंतर हल्लेखोर पसार झाला.

मृत दीपकचे काका हलधर रात्रे यांनी हल्लेखोराने मजुरांची जात आणि धर्म विचारल्यानंतर त्यांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. मात्र, या दाव्याला प्रशासनाकडून अद्याप अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. तपास यंत्रणांकडून हल्ल्याचा नेमका उद्देश आणि घटनेमागील परिस्थितीचा तपास सुरू आहे.

जम्मू-कश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी दोन्ही पीडित कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनीही हत्येचा निषेध करत मृतदेह छत्तीसगडमध्ये आणण्यासाठी जम्मू-कश्मीर प्रशासनाशी समन्वय साधण्याचे निर्देश दिले आहेत.

या घटनेमुळे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचीही आठवण झाली आहे. पहलगाममध्येही दहशतवाद्यांनी पर्यटकांची ओळख आणि धर्म विचारल्यानंतर त्यांना लक्ष्य केल्याचा तपासात दावा करण्यात आला होता.

त्यामुळे दोन्ही घटनांमधील साम्याची सुरक्षा यंत्रणांकडून दखल घेतली जात आहे. कुलगाम परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली असून हल्लेखोराच्या शोधासाठी तपास सुरू आहे.

### कुलगाममध्ये दोन मजुरांची हत्या

कुलगाम येथील वीटभट्टीवर काम करणाऱ्या छत्तीसगडमधील दोन मजुरांची दहशतवाद्याने गोळ्या झाडून हत्या केली. हल्ल्यापूर्वी त्याने मजुरांशी सुमारे २० मिनिटे संवाद साधल्याची माहिती समोर आली असून, पीडित कुटुंबांना जम्मू-कश्मीर सरकारकडून प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

### हल्ल्यापूर्वी दहशतवाद्याने साधल्या गप्पा

कुलगाममधील वीटभट्टीवर हल्ला करण्यापूर्वी संशयित दहशतवादी लतीफ बट याने मजुरांशी सुमारे २० मिनिटे संवाद साधला. त्यानंतर पाणी मागून संधी साधत दोघांवर गोळीबार केला आणि घटनास्थळावरून पसार झाला.




# कंगनाचा पलटवार

सोशल मीडियावर 'आपण हृतिक रोशनची माफी मागितली पाहिजे' हा ट्रेंड व्हायरल होत असताना, अभिनेता हृतिक रोशनच्या प्रतिक्रियेवर अभिनेत्री व भाजप खासदार कंगना रणौतने पलटवार केला आहे. इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे कंगनाने हृतिकसोबतच त्याची गर्लफ्रेंड सबा आझादचाही उल्लेख करत, तिची फजिती करणे थांबवण्याचा सल्ला दिला. कंगनाने लिहिले की, "तू आणि सबा एकत्र छान दिसता. अशा प्रकारे एखाद्या महिलेला टोमणे मारणे तुला शोभत नाही. माझा छळ करण्यासाठी तुझ्या नावाचा वापर करणाऱ्यांचा निषेध कर." तसेच, "आगीत तेल ओतणे आणि तुझ्या जोडीदाराची फजिती करणे थांबव," असेही तिने म्हटले. अलीकडेच 'जेन झी' पिढीबाबत केलेल्या वक्तव्यामुळे कंगना ट्रोल झाली होती. त्यानंतर २०१६ मधील हृतिक-कंगना कायदेशीर वाद पुन्हा चर्चेत आला आणि 'Apologise to Hrithik Roshan' हा ट्रेंड सोशल मीडियावर जोर धरू लागला.



# कीर्ती कुल्हारी फसली चोरट्यांच्या जाळ्यात

डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या युगात सायबर गुन्हेगार किती चलाख झाले आहेत, याचं आणखी एक धक्कादायक उदाहरण समोर आलं आहे. बॉलिवूड अभिनेत्री कीर्ती कुल्हारी यांच्याच क्रेडिट कार्डवर सायबर चोरट्यांनी डल्ला मारत अवघ्या काही मिनिटांत ₹२,४३,८५२ इतकी रक्कम लंपास केली. विशेष म्हणजे, कार्डचा पासवर्ड कोणाशीही शेअर केला नसतानाही अज्ञात हॅकर्सनी त्यांच्या मोबाईल आणि क्रेडिट कार्डमध्ये अनधिकृत प्रवेश मिळवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे डिजिटल व्यवहारांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अभिनेत्रीच्या तक्रारीनंतर आंबोली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून सायबर सेलच्या मदतीने तपास सुरू केला आहे.




# 'काकण'नंतर नव्या चित्रपटाची घोषणा!

आयुष्यातील काही नाती बदलतात, काही दूर जातात, पण मैत्रीचं नातं यापलीकडचं असतं. अनेक मैत्रीचे किस्से आपण ऐकलेले असतात किंवा मग पाहिलेले असतात. मैत्रीच्या दिवशी म्हणजेच फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने अभिनेत्री आणि दिग्दर्शिका क्रांती रेडकर वानखेडे हिने सोशल मीडियावरुन एक खास गिफ्ट चाहत्यांना दिलं आहे.

मैत्रीच्या शब्दांपलीकडच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या 'मैत्रेया' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. समर टाईम्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन क्रांती रेडकर वानखेडे यांनी केले आहे.

'काकण'सारख्या संवेदनशील चित्रपटानंतर त्या पुन्हा एकदा वेगळ्या आणि भावनिक विषयासह प्रेक्षकांसमोर येत आहेत. चित्रपटाची निर्मिती मनोज खळतकर यांनी केली आहे. चित्रपटाच्या पोस्टरमधून समर, आयुषी, स्काय आणि रुची या चार प्रमुख पात्रांची ओळख करून देण्यात आली आहे.

या चार जणांच्या आयुष्याभोवती कथा फिरणार असल्याचे संकेत पोस्टरमधून मिळतात. मात्र, त्यांच्या नात्याचे नेमके स्वरूप काय आहे आणि कथेत कोणते भावनिक पैलू उलगडणार आहेत, याबाबत अद्याप गुप्तता राखण्यात आली आहे.

चित्रपटाविषयी बोलताना क्रांती रेडकर वानखेडे म्हणाल्या, "'मैत्रेया' ही प्रत्येकाच्या आयुष्यातील अशा मैत्रीची गोष्ट आहे, जी काळ बदलला तरी मनाच्या एका खास कोपऱ्यात कायम राहते. या चित्रपटात मैत्रीचे विविध रंग, नात्यांमधील गुंतागुंत आणि आयुष्याची अनपेक्षित वळणं प्रेक्षकांना अनुभवायला मिळतील. 'काकण'नंतर आणखी एक वेगळी आणि भावनिक कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना खूप आनंद होत आहे. हा प्रवास लवकरच सर्वांसोबत शेअर करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

'मैत्रेया'च्या घोषणेनंतर या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, या चित्रपटाशी संबंधित अधिक माहिती समोर येण्याची चाहत्यांना प्रतीक्षा लागली आहे.

# टीम इंडियाला मोठा धक्का!

## जसप्रीत बुमराह श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतून बाहेर; गुडघ्याचा त्रास कायम असल्याने विश्रांती

**महाईन्यूज । कोलंबो**

**श्रीलंकेविरुद्ध १५ ऑगस्टपासून गॉले येथे सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह बाहेर पडला आहे. 'बीसीसीआय'च्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स' (CoE) मधील सुरुवातीच्या तपासणीनंतर, बुमराहच्या डाव्या पायाच्या गुडघ्याचा त्रास अजूनही पूर्णपणे कमी झालेला नसल्याचे समजते. त्यामुळे त्याला घाईघाईत मैदानात उतरवणे सुरक्षित नसल्याचा निर्णय वैद्यकीय पथक आणि संबंधितांनी घेतला असून, त्याला पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे.**



### आकिब नबीचे नाव चर्चेत

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघात बुमराहचा समावेश 'फिटनेस क्लिअरन्स'च्या अटीवर करण्यात आला होता. आता अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती लवकरच त्याच्या बदल्यात दुसऱ्या गोलंदाजाच्या नावाची घोषणा करण्याची शक्यता आहे. यामध्ये आकिब नबी शर्यतीत सर्वात पुढे आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीपूर्वी त्याने भारतीय संघासोबत सराव केला होता, तसेच गेल्या महिन्यात 'इंडिया ए' संघासोबत त्याने श्रीलंका दौराही केला होता.जम्मू आणि काश्मीरकडून देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने उत्तम कामगिरी करणाऱ्या २९ वर्षीय आकिब नबीने श्रीलंकेतील दोन सामन्यांत ६ बळी घेतले होते. सध्या भारताच्या वेगवान गोलंदाजीच्या ताफ्यात मोहम्मद सिराज, गुरनूर ब्रार आणि प्रसिद्ध कृष्णा यांचा समावेश आहे.

टी-२० विश्वचषकाच्या महत्त्वाच्या टप्प्यात बुमराहच्या गुडघ्याची दुखापत उफाळून आली होती. त्यानंतर 'बीसीसीआय'च्या वैद्यकीय पथकाने त्याला इंजेक्शन घेण्याचा सल्ला दिला होता. ३२ वर्षीय बुमराहने गेल्या महिन्यात ठरल्याप्रमाणे इंजेक्शन घेतले खरे, पण त्याला पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे.

कोलंबो येथील दुसऱ्या कसोटीसाठी त्याला संघात घेण्याबाबत चर्चा झाली होती, परंतु वैद्यकीय पथकाने कोणताही धोका पत्करण्यास स्पष्ट नकार दिला आहे.बुमराहला पूर्ण वेळ देण्याचे आधीच ठरले होते. त्यामुळेच ४ ऑगस्ट रोजी श्रीलंकेसाठी रवाना होण्यापूर्वी, ३ ऑगस्टला मुंबईत एकत्र येणाऱ्या खेळाडूंच्या यादीत त्याचा समावेश करण्यात आला नव्हता.

"पूर्वी अनेकदा खेळाडूंना घाईघाईत मैदानात उतरवल्यामुळे त्यांची दुखापत अधिक बळावल्याची उदाहरणे आहेत. बुमराहसारख्या मुख्य गोलंदाजाबाबत आपण असा धोका मुळीच पत्करू शकत नाही. त्याच्यासाठी पूर्ण तंदुरुस्ती हाच एकमेव उद्देश आहे, कारण या वर्षात पुढे भरपूर क्रिकेट बाकी आहे. यामध्ये आशियाई खेळ, न्यूझीलंड दौरा आणि पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणारी महत्त्वाकांक्षी 'बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी' यांचा समावेश करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघात बुमराहचा समावेश 'फिटनेस क्लिअरन्स'च्या अटीवर करण्यात आला होता. आता अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती लवकरच त्याच्या बदल्यात दुसऱ्या गोलंदाजाच्या नावाची घोषणा करण्याची शक्यता आहे. यामध्ये आकिब नबी शर्यतीत सर्वात पुढे आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीपूर्वी त्याने भारतीय संघासोबत सराव केला होता, तसेच गेल्या महिन्यात 'इंडिया ए' संघासोबत त्याने श्रीलंका दौराही केला होता.

## राष्ट्रकुलमध्ये भारताची विक्रमी कामगिरी; बॉक्सिंगमध्ये जिंकली सात सुवर्ण पदके

**महाईन्यूज । ग्लास्गो**

**येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंग स्पर्धेची सांगता भारताने सात सुवर्णपदकांच्या विक्रमी कमाईसह केली. शनिवारी पुरुष गटातील ९०+ किलो वजनी गटात नरेंद्रने रौप्यपदक जिंकले. पुरुष गटातील ९०+ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडच्या डमार थॉमसने नरेंद्रचा पराभव केला. या सामन्यात नरेंद्रला ०-५ अशा एकमताने पराभवाचा सामना करावा लागला आणि त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.**





### साक्षी चौधरीचा एकतर्फी विजय!

महिलांच्या ५१ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात साक्षी चौधरीने इंग्लंडच्या रुबी व्हाईट हिचा ५-० असा एकतर्फी पराभव केला. साक्षीने सामन्याच्या तिन्ही फेऱ्यांमध्ये पूर्ण वर्चस्व राखत प्रतिस्पर्धी खेळाडूला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. पंचांनी सर्वसंमतीने साक्षीच्या बाजूने कौल दिला. पराभवाच्या भावनेने इंग्लिश बॉक्सरच्या डोळ्यात अश्रू आले, तर साक्षीने तिरंगा उंचावत जल्लोष केला. हे भारताचे बॉक्सिंगमधील तिसरे सुवर्ण ठरले. महिलांच्या ६० किलो वजनी गटाच्या फायनलमध्ये प्रिया घंघासचा सामना कॅनडाच्या मॅरी बाथेल अल अहमदीशी झाला.

तत्पूर्वी, पुरुष गटातील ८० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात अंकुश पांघलने इंग्लंडच्या डिमेजी शिट्टूचा ४-१ अशा विभाजित निर्णयाने पराभव करून भारतासाठी सातवे सुवर्णपदक जिंकले. भारताचे इतर सुवर्णपदक विजेते खेळाडू सचिन सिवाच, जास्मिन लंबोरिया, प्रीती पवार, साक्षी चौधरी, अरुंधती चौधरी आणि प्रिया घांघस हे होते. ऑलिम्पिक पदक विजेती लव्हलिना बोर्गोहेन आणि जादुमणी सिंग यांनीही रौप्यपदके जिंकली.

पुरुष गटातील ६० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात सचिनने नामिबियाच्या ट्रायअगेन मॉर्निंग न्डेव्हेलोचा एका रोमांचक लढतीत पराभव केला. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये पिछाडीवर पडल्यानंतर, भारतीय खेळाडूने अंतिम फेरीत प्रतिस्पर्ध्याला 'स्टँडिंग काउंट' घेण्यास भाग पाडले आणि ३-२ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने विजय मिळवला.

महिलांच्या ७० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या एम्मा-सू ग्रीनट्रीकडून १-४ अशा 'स्प्लिट डिसिजन'ने पराभूत झाल्यामुळे लव्हलिना बोर्गोहेनला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. महिलांच्या ७० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात अरुंधतीने इंग्लंडच्या चँटेल रीडचा ५-० अशा एकमताने पराभव केला. महिलांच्या ५४ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात प्रीतीने कॅनडाच्या स्कारलेट डेलगाडोचा ५-० असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर, विद्यमान जागतिक विजेती जास्मिन हिने महिलांच्या ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात नॉर्दर्न आयर्लंडच्या गतविजेत्या मायकेला वॉल्शचा ५-० असा पराभव केला.

महिलांच्या ५१ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात साक्षीने इंग्लंडच्या रुबी व्हाईटचा ५-० असा पराभव करून भारतासाठी त्या दिवसाचे तिसरे बॉक्सिंग सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या ६० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात प्रियाने कॅनडाच्या मेरी-बथूल अल-अहमदीहचा 'स्प्लिट डिसिजन'द्वारे ४-१ असा पराभव केला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 03 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

BA
LIBERAL ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.

- GLOBAL PERSPECTIVE
  Understand the world.
- CRITICAL THINKING
  Question. Analyze. Evolve.
- COMMUNICATION
  Express ideas with impact.
- INTERDISCIPLINARY LEARNING
  Connect concepts. Create solutions.
- DIVERSE CAREER PATHS
  Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# भाजपामध्ये ‘कोअर कमिटी’च निर्णायक!

## समाजमाध्यमांमधील आरोप राजकीय; सामूहिक निर्णय प्रक्रियेलाच ‘गटबाजी’चे लेबल?

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ताधारी भाजपमध्ये अंतर्गत गटबाजी असल्याचा आरोप समाजमाध्यमांमधून सातत्याने केला जात आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतील काही उपसूचना, प्रशासकीय निर्णय आणि पदाधिकाऱ्यांमधील चर्चांचा आधार घेत भाजपमध्ये अनेक सत्ताकेंद्रे निर्माण झाल्याचा दावा केला जात आहे. याबाबत आम्ही शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची भूमिका जाणून घेतली.**



गटबाजी, मतभेद आणि अंतर्गत कलह... अशा या सर्व आरोपांचे खंडन करत भाजपाने स्पष्ट केले आहे की, मतभिन्नता म्हणजे गटबाजी नव्हे आणि पक्षातील प्रत्येक महत्त्वाचा निर्णय हा कोअर कमिटीच्या सामूहिक चर्चेनंतरच घेतला जातो.

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, पक्षामध्ये कोणतीही गटबाजी नाही. महापालिकेतील प्रशासन, विकासकामे, धोरणात्मक निर्णय किंवा राजकीय भूमिका याबाबत महापौर, सभागृह नेते, आमदार, वरिष्ठ पदाधिकारी आणि संघटनात्मक नेतृत्व यांच्यामध्ये चर्चा होणे ही पक्षाची कार्यपद्धती आहे. सर्व बाजू ऐकून, कायदेशीर आणि प्रशासकीय पैलूंचा विचार करून अंतिम निर्णय कोअर कमिटीमध्ये घेतला जातो. त्यानंतर त्याची अंमलबजावणी सर्व लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांकडून एकसंघपणे केली जाते.

राजकीय विश्लेषकांच्या मते, मोठ्या पक्षांमध्ये मतांची देवाणघेवाण, विविध पर्यायांवर चर्चा आणि निर्णयापूर्वी अनेक स्तरांवर सल्लामसलत होणे ही लोकशाहीचीच प्रक्रिया असते. अशा चर्चांना गटबाजीचे स्वरूप देणे हे वस्तुस्थितीपेक्षा राजकीय अर्थ लावण्याचा प्रकार ठरू शकतो.

### उपसूचना मागे घेणे म्हणजे जबाबदार निर्णय

अलीकडे काही उपसूचनांवरून भाजपावर टीका करण्यात आली. त्याद्वारे ‘नॅरेटिव्ह’ करण्याचा प्रयत्न होतो. मात्र, शहर अभियंत्यांच्या पदांबाबतची उपसूचना असो किंवा इतर काही प्रशासकीय प्रस्ताव, त्यामध्ये कायदेशीर अडचणी लक्षात आल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यात आला. विरोधकांनी याला “यू-टर्न” म्हटले; मात्र भाजपाच्या मते, कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेणे हीच सुशासनाची ओळख आहे.

एखादा प्रस्ताव पुढे नेल्यानंतर त्यात तांत्रिक अडचणी असल्याचे निदर्शनास आल्यास त्याचा फेरविचार करणे हे परिपक्व नेतृत्वाचे लक्षण आहे. चुकीचा निर्णय केवळ प्रतिष्ठेचा प्रश्न बनवून कायम ठेवण्यापेक्षा त्यामध्ये आवश्यक सुधारणा करणे ही अधिक जबाबदार भूमिका असल्याचे शत्रुघ्न काटे यांनी ठामपणे सांगितले.

महापालिकेतील पाणीपुरवठा, विकासकामे, निधीचे नियोजन किंवा प्रशासकीय रचना अशा अनेक विषयांवर वेगवेगळी मते समोर येतात. विविध पदाधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या सूचना दिल्या जातात. मात्र, अंतिम निर्णय पक्षाच्या अधिकृत भूमिकेनुसारच घेतला जातो.

लोकशाहीमध्ये चर्चा, मतभेद आणि विचारमंथन याला महत्त्व असते. प्रत्येक मुद्द्यावर सर्वांनी सुरुवातीपासून एकच भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा लोकशाहीत नसते. उलट विविध पर्यायांचा विचार करून सर्वोत्कृष्ट निर्णय घेण्याची प्रक्रिया हीच मजबूत संघटनात्मक व्यवस्थेची ओळख मानली जाते.

> “भाजपमध्ये कोणतीही गटबाजी नाही. पक्षाची कोअर कमिटी एकत्रित निर्णय घेते. त्याची अंमलबजावणी करण्यात येते. विविध विषयांवर चर्चा होणे ही संघटनात्मक प्रक्रिया आहे. त्याचा अर्थ अंतर्गत संघर्ष असा होत नाही.”
>
> **- शत्रुघ्न (बापू) काटे, भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक, पिं. चिं. मनपा.**

### भाजप चा विस्तार आणि समन्वयाची गरज

महापालिकेत भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तब्बल १२८ पैकी ८५ जागा निवडून आल्या आहेत. विविध सामाजिक, राजकीय आणि भौगोलिक पार्श्वभूमी असलेले नगरसेवक आज पक्षात आहेत. अशा परिस्थितीत कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर विस्तृत चर्चा होणे स्वाभाविक आहे. प्रत्येक विषयावर एकच मत असणे शक्य नसते. मात्र, चर्चा संपल्यानंतर पक्षाचा अधिकृत निर्णय सर्वांनी स्वीकारणे ही भाजपाची परंपरा आहे, असे शत्रुघ्न काटे यांनी सांगितले.

---

# सेक्टर क्रमांक १२ मधील विद्यार्थी, कामगार व प्रवाशांसाठी निगडी बससेवेचा शुभारंभ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ८ मधील सेक्टर क्रमांक १२ च्या परिसरातील विद्यार्थी, कामगार तसेच नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी नवीन निगडी बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनानुसार सुरू करण्यात आलेल्या बस मार्ग क्रमांक ३४० – आळंदी ते निगडी, पीएम आवास योजना, सेक्टर क्रमांक १२ (बी.आर.टी.) या बससेवेचे लोकार्पण करण्यात आले.**




सेक्टर क्रमांक १२ आणि परिसराचा वाढता विस्तार, पीएम आवास योजना तसेच परिसरातील विविध सोसायट्या, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक भागात कामानिमित्त ये-जा करणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षात घेता सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर नवीन बस मार्ग सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या बससेवेमुळे सेक्टर क्रमांक १२, पीएम आवास योजना परिसरातील नागरिकांना आळंदी, चिखली, मोशी, निगडी तसेच शहरातील विविध भागांमध्ये ये-जा करण्यासाठी अधिक सुलभ आणि सोयीस्कर सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे. विशेषतः विद्यार्थी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही सेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

नवीन बससेवा सुरू झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, या बस मार्गामुळे दैनंदिन प्रवास अधिक सोपा आणि सुकर होण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले. भविष्यात नागरिकांच्या गरजेनुसार बससेवेची वारंवारता वाढविण्यासह आणखी नवीन मार्ग सुरू करण्यासाठी पाठपुरावा करण्याची अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

या लोकार्पण कार्यक्रमाला नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, नगरसेविका नम्रता लोंढे, भाजपा मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, विजय अण्णा चौधरी, चिखली-मोशी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, ॲड. अतुल कांबळे, अशोक मोरे, बी टाईप सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष बाबाजी कळमकर, ए टाईप सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांच्यासह परिसरातील नागरिक, सोसायटी प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

> “सेक्टर क्रमांक १२ परिसरातील विद्यार्थी, कामगार आणि प्रवाशांसाठी बस मार्ग क्र. ३४० सुरू होणे ही अत्यंत आनंदाची आणि स्वागतार्ह बाब आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनातून नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन ही सुविधा उपलब्ध झाली आहे. आळंदी ते निगडी, पीएम आवास योजना, सेक्टर क्रमांक १२ या मार्गामुळे नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि किफायतशीर होणार आहे. विशेषतः विद्यार्थी, महिला, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा फायदा होईल.”
>
> **- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिं. चिं. मनपा**

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा समतेचा संदेश प्रेरणादायी!

## ज्येष्ठ नेते संदिपान झोंबाडे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या वतीने सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने आणि परिवर्तनवादी विचारांनी समाजातील वंचित, उपेक्षित आणि कष्टकरी घटकांना आत्मभान देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारणे, पुढे नेणे आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचे सामाजिक योगदान पोहोचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे नगरसेवक तथा शहर सुधारणा समितीचे सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी केले.**



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित विचार प्रबोधन पर्वानिमित्त निगडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक येथे आयोजित कार्यक्रमास डॉ. सुहास कांबळे यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्वानिमित्त उपस्थित समाज बांधवांना डॉ. सुहास कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या. हे विचार प्रबोधन पर्व अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा जागर करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. समाजातील सर्व घटकांनी अण्णाभाऊंच्या विचारांचा स्वीकार करून सामाजिक सलोखा आणि समतेची भावना अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, कार्यक्रमास उपस्थित राहून अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केल्याबद्दल ज्येष्ठ नेते श्री. संदिपानजी झोंबाडे तसेच जयंती उत्सव समितीचे आजी-माजी अध्यक्ष व सदस्य यांच्या वतीने नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, समाज बांधव, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> “साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे फक्त एक साहित्यिक किंवा लोकशाहीर नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी भाष्यकार होते. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या संघर्षाला आवाज दिला. समता, बंधुता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायाची मूल्ये समाजात रुजविण्यासाठी त्यांच्या विचारांचे चिंतन आजही तितकेच महत्वपूर्ण आहे, त्यांच्या साहित्यामध्ये केवळ मनोरंजन नसून सामाजिक परिवर्तनाची ताकद होती. त्यामुळे अण्णाभाऊंचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे”
>
> **- डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, पिं. चिं. मनपा.**

# बनावट NEFT स्क्रीनशॉट दाखवून सोनाराला लुटले

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**


दागिने बनवून घेतल्यानंतर उर्वरित रक्कम एनईएफटीद्वारे पाठवल्याचा बनावट स्क्रीनशॉट दाखवत एका सोनाराची ६ लाख २९ हजार ७८० रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार दिघीतील सावंतनगर येथील कृष्णा सिल्वर वर्कशॉपमध्ये घडला.

याप्रकरणी निलेश बाळकृष्ण जाधव (वय ४६, रा. आदर्शनगर, दिघी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार विवेक आनंद हातकामकर (वय ३६, रा. पोलादपूर, महाड, जि. रायगड) याच्याविरोधात दिघी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून सुरुवातीला ३ लाख रुपये आगाऊ दिले. त्यानंतर फिर्यादीकडून ५९.८७० ग्रॅम वजनाचे एकूण ९ लाख २९ हजार ७८० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बनवून घेतले.

दागिने घेताना उर्वरित ६ लाख २९ हजार ७८० रुपये एनईएफटीद्वारे पाठवल्याचा खोटा स्क्रीनशॉट आरोपीने फिर्यादीला दाखवला. पैसे खात्यात जमा झाल्याचा विश्वास निर्माण करून आरोपी दागिने घेऊन निघून गेला. प्रत्यक्षात पैसे जमा न झाल्याचे लक्षात आल्यानंतर फसवणूक झाल्याचे उघड झाले.

या प्रकरणी १ ऑगस्ट रोजी दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अद्याप अटक झालेली नाही. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.




# पिंपरी-चिंचवडमध्ये मतदार पडताळणीला मंद प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) या मतदार पडताळणी मोहिमेत शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघांतील सर्व पात्र मतदारांनी नोंदणी केली जात आहे. मात्र, हे प्रमाण खूपच कमी असून, उर्वरित सात दिवसांत सर्व मतदारांची पडताळणी होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभरात ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत बीएलओंकडून मतदारांकडून गणना अर्ज भरून घेतला जात आहे. अर्ज वेळेत भरून सादर करणाऱ्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात येत आहे. प्रारूप यादी 17 ऑगस्टला प्रसिद्ध केली जााणार आहे.

मात्र, बीएलओकडून घरोघरी जाऊन अर्ज भरून घेतले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. नगरसेवक किंवा राजकीय पदाधिकाऱ्यांच्या संपर्क कार्यालयात बसून बीएलओंकडून अर्ज भरून घेतले जात आहेत. मतदान केंद्रात गेल्यानंतर बीएलओ नाहीत. मनुष्यबळ अपुरे आहे, अशी कारणे दिली जात आहेत. त्यामुळे नागरिक वैतागले आहेत. पावसात त्यांना बीएलओचा शोध घ्यावा लागत आहे. तसेच, नागरिकांमध्ये मतदार यादी नाव पडताळणीसाठी उत्साह नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकही नाव पडताळणीसाठी उदासीन असल्याचे चित्र आहे. पिंपरी विधानसभा मतदारसंघात आत्तापर्यंत एकूण 65 टक्के मतदारांची नोंदणी झाली आहे. चिंचवड मतदारसंघात 45 टक्के काम झाले आहे. तर, भोसरी मतदारसंघात 50 टक्के नोंदणी पडताळणीचे काम पूर्ण झाले आहे.

### नवीन मतदारांना सूचना

पात्र मतदारांची नावे समाविष्ट झालेली नसतील किंवा नव्याने मतदार म्हणून नोंदणी करावयाची असल्यास त्यांना 17 ऑगस्ट ते 16 सप्टेंबर या कालावधीत नमुना क्रमांक सहा भरून अर्ज करता येणार आहे. मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्रमांक आठ, तर चुकीच्या किंवा अपात्र नोंदी वगळण्यासाठी नमुना क्रमांक सात सादर करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

# स्मार्ट सिटीचा 'डिजिटल' कारभार संकटात

## पात्रता फेरीत नीरजने ७९.६१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो नोंदवला; 'राष्ट्रकूल'मध्ये रंगणार मेडलचा थरार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीने शहरभरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे कालबाह्य झाले आहेत. त्यामुळे ते आता वापरण्यायोग्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्या ठिकाणी नव्याने कॅमेरे लावावे लागणार आहेत. तो कोट्यवधींचा खर्च महापालिका प्रशासनाला करावा लागणार आहे.**




स्मार्ट सिटी कंपनीने शहरभरात सुमारे नऊ हजार सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्या कॅमेऱ्याची पाच वर्षांची गॅरंटी देण्यात आली होती. ते कॅमेरे लावून आठ वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने ते आता व्यवस्थित चालत नाहीत. अनेक कॅमेरे बंद तसेच, नादुरुस्त आहेत. कॅमेऱ्यासाठी लावलेल्या बॅटऱ्या चोरीला गेल्या आहेत. त्यामुळे स्मार्ट सिटीने केलेला कोट्यवधींचा खर्च वाया गेला आहे. शहरातील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद असून, ते तातडीने सुरू करावेत, असे पत्र पिंपरी-चिंचवड पोलिसांनी महापालिकेस दिले आहे. मात्र, त्यावर तातडीने कार्यवाही होत नसल्याने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी संताप व्यक्त केला.

कोट्यवधी रुपये खर्च करून लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे कालबाह्य झाल्याने आता उपयोगाचे राहिले नसल्याने नगरसेवकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील कॅमेरे हे केवळ शोभेचे आहेत. त्याचा पोलिस यंत्रणेला काही फायदा होत नाही, असा आरोप नगरसेवक योगेश बहल व प्रमोद कुटे यांनी केला.

त्याबाबत स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांना समाधानकारक खुलासा करता आला नाही. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची मुदत पाच वर्षे असून, त्यापुढे पाच वर्षे संबंधित टेक महिंद्रा या ठेकेदार कंपनीकडून देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे, असा दावा त्यांनी केला.

### कामचुकार ठेकेदाराला काळ्या यादीत टाका

डीएमएस ई-ऑफिस प्रकल्पासाठी कोटीवधी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे; तसेच, शहरातील निम्म्यापेक्षा अधिक कॅमेरे बंद आहेत. सत्ताधाऱ्यांनी ठराविक ठेकेदाराला डोळ्यासमोर ही प्रक्रिया राबविवली आहे. मोठा खर्च करूनही ही डीएमएस प्रणाली वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून, महसूल बुडत आहे. संबंधित ठेकेदाराला केवळ नोटिसा दिल्या जात असून, ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. झालेले नुकसान व खर्च स्मार्ट सिटीचे संबंधित अधिकारी व ठेकेदार तसेच, सल्लागारांकडून वसूल करावा. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून, कठोर कारवाई करावी, असे सामाजिक कार्यकर्त मारुती भापकर यांनी सांगितले.

### टेबलवर फाईलींचे ढीग

महापालिकेने डीएमएस ई-ऑफिस प्रणाली 1 एप्रिल 2025 पासून सुरू केली आहे. त्या दिवसापासून महापालिकेचे कामकाज ऑनलाईन सुरू आहे. त्यामुळे महापालिकेचा पेपरलेस कारभार सुरू झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे महापालिकेचे राज्य शासनाचा पुरस्कारही मिळाला आहे. तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी तो पुरस्कार स्वीकारला होता. असे असले तरी, ती प्रणाली ढिम्मच असल्याने अधिकारी व कर्मचारी वैतागले आहेत. पेपरलेस कारभार असला तरी, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टेबलवरील फाईलीचे ढीग मात्र कमी होत नसल्याचे चित्र आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील 'स्मार्ट' पदपथ अतिक्रमणाच्या विळख्यात; चालायचे कुठून?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्मार्ट सिटीअंतर्गत मोठ्या प्रमाणावर पदपथांचा विकास केला आहे. त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. परंतु, ज्या उद्देशाने विस्तृत पदपथ उभारले आहेत ते पादचाऱ्यांना वापरता येत आहेत का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. आज शहरातील कोणत्याही रस्त्यावरून प्रवास केला तर एकही पदपथ पादचाऱ्यांसाठी सुरक्षित असल्याचे दिसून येत नाही. त्या पदपथांवर स्थानिक व्यावसायिक, पथारीवाले तसेच लहान मोठे हातगाडीवाले यांनी अतिक्रमण केले आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण निर्मूलन विभाग शहरभर अतिक्रमण हटविण्याचे दावे करत असले, तरी प्रत्यक्षात कासारवाडीतील केशवनगर परिसरातील सिद्धिविनायक मंदिरासमोरील अंतर्गत वर्दळीचा रस्ता अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला आहे. पादचाऱ्यांसाठी उभारण्यात आलेला पदपथ मंडपाचे बांबू, खांब, वासे, लोखंडी सांगाडे, हातगाड्या आणि विविध व्यावसायिक साहित्याने अक्षरशः गिळंकृत केला असून, या गंभीर प्रकाराकडे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, सोसायटीतील रहिवासी तसेच सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जीव मुठीत धरून मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे. "रस्ता वाहनांचा आणि पदपथ अतिक्रमणाचा, मग नागरिकांनी चालायचे कुठून?" असा संतप्त सवाल परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

या रस्त्यालगत अनेक बैठी घरे तसेच गृहनिर्माण सोसायट्या आहेत. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साहित्य ठेवण्यात आले आहे, त्याच ठिकाणी एका सोसायटीचे मुख्य प्रवेशद्वार आहे. त्यामुळे रहिवाशांना दररोज ये-जा करताना तसेच चारचाकी व दुचाकी वाहने बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर या अतिक्रमणाचा थेट परिणाम होत असून, प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना व्यक्त होत आहे. मंडप उभारण्यासाठी वापरले जाणारे बांबू, खांब, वासे अक्षरशः रस्त्यावर ठेवण्यात आले आहेत. त्याचबरोबर फ्लेक्स उभारण्यासाठी वापरले जाणारे १० बाय १० फुटांचे मोठमोठे लोखंडी सांगाडे पदपथावर उभे करण्यात आले आहेत.

### अतिक्रमणांवर कारवाई कधी?

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने तातडीने कारवाई करून पदपथावरील मंडपाचे साहित्य, लोखंडी सांगाडे, हातगाड्या व इतर अडथळे हटवावेत, पादचाऱ्यांसाठी पदपथ तात्काळ मोकळा करावा आणि अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केशवनगर परिसरातील नागरिकांनी केली आहे. स्थानिकांच्या मते, प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महापालिकेवर राहील.